नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 04/01/2022 (मंगळवार)
(दुपार)

---

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत 200 मी. अंतरावरील मौजा मेन रोडवर स्टेट बॅक समोर सावनेर येथे दिनांक 03/01/2022 चे 19:00 वा. दरम्यान एमएच— 40/सीडी— 9674 क्रमांकाचा अशोक लेलंड कंपनीचा टिप्पर वरिल अनोळखी चालक आरोपीने आपल्या ताब्यातील टिप्पर हा भरधाव वेगात हयगयीने रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून सावनेर शहरात अवजड वाहनाचे प्रवेश बंदी असतानाही वर्दळीच्या रस्त्यावर निष्काळजीपणे चालवुन एमएच— 40/बी झेड— 3518 क्रमांकाच्या मोटरसायकल वरिल चालक अर्थव शालीकराम काळे वय 16 वर्ष रा. रेल्वे क्रॉसिंग च्या पलीकडे पंचशिल नगर, सावनेर ता. सावनेर जि नागपूर याचे मोटरसायकला धक्का लागल्याने तो गंभीर जखमी होवून मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— राहुल कमलकिशोर रूशिया, वय 24 वर्ष, रा.रंगारी मोहल्ला वार्ड क्र. 15 सावनेर जि. नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 119, 177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री नागवे मो क्रं. 9823403565 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कोंढाळी :— अंतर्गत 02 कि.मी. अंतरावरील मौजा साई ले—आउट कोंढाळी येथे दिनांक 23/12/2021 चे 09:30 वा. दरम्यान आरोपी नामे— प्रविण प्रभाकर खंडाते (मृतक), वय 27 वर्ष रा. जोगा ता.कारंजा जि.वर्धा हा त्याच्या एम.एच—40/बी.झेड—7252 क्रमांकाच्या मोटरसायकलनी जोगा गावावरून धुरखेडा मार्गे कोंढाळी येथे जात होता. त्यादरम्यान साईनगरी लेआउट जवळ त्याने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने त्याची मोटरसायकल स्लिप होवुन तो रोडवर पडला. या अपघातात त्याच्या कपाळावर व ओठाला मार लागुन जखमी झाल्याने त्यास उपचाराकरिता पी.एच.सी. कोंढाळी येथुन रेफर केल्याने मेयो हॉस्पीटल नागपुर येथे उपचार घेत असतांना दि. 03/01/2022 रोजी 10.15 वा. मरण पावला. सदर मृतकाचे कागदपत्रे प्राप्त करून व चौकशी वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक मंगेश धारपुरे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री ढगे मो.नं. 9518979499 हे करीत आहे.

3) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 08 कि.मी. अंतरावरील हायवे–47 महामार्गा वरील उडान पुल, पिपळा, डाग बंगला येथे दिनांक 02/01/2022 चे 21.30 वा. ते 21.45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– नबिरा मुसरफ शेख, वय 32 वर्ष, रा. महाजन ले–आउट, फुले चौक, सावनेर ही सावनेर येथील रहिवासी असून ती आपले पती नामे– मुसरफ शेख अब्दूल अमिन शेख व मुलगा अरमान मुसरफ शेख, वय 13 वर्ष, व मुलगी शिबा मुसरफ शेख, वय 07 वर्ष यांचेसह नागपूर येथे जावून सावनेर कडे आपले घरी एम.एच–40/ए.ए.–5006 क्रमांकाची होन्डा शाईन मोटरसायकलने परत जात होते. त्यादरम्यान एम.एच.–31/ई.एच.–5279 क्रमांकाच्या होन्डा मोटरसायकलच्या चालक आरोपी नामे– आशिष ज्ञानेश्वर ठाकरे वय 26 वर्ष, रा. झिंगाबाई टाकळी,नागपूर याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे तसेच आपले वाहतुकिच्या विरूदध दिशेने चालवून फिर्यादीच्या पतीच्या मोटरसायकला जोरदार धडक दिली. या अपघातात फिर्यादीचे पती, हे गंभीर जखमी होवून उपचारा दरम्यान ॲलेक्सीस हॉस्पीटल नागपूर येथे मरण पावले. तसेच फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा, मुलगी, आशिष यांच्या गंभीर दुखापतीस आरोपी कारणीभूत ठरला. तसेच रोहीत भास्कर काळे हा अपघातात उडान पुलाच्या खाली सर्व्हिस रोडवर पडून मृत पावला.
मृतक 1) मुसरफ शेख अब्दूल अमिन शेख,वय 27 वर्ष, रा. महाजन ले–आउट, फुले चौक, सावनेर (मृतक), 2) रोहीत भास्कर काळे, वय 27 वर्ष, बमलेश्वरी नगर, गोंदणी रोड, नागपूर तर जखमी नामे– 3) नबिरा मुसरफ शेख, वय 32 वर्ष, रा.महाजन ले–आउट,फुले चौक, सावनेर, 4) अरमान मुसरफ शेख, वय 13 वर्ष, रा. महाजन ले–आउट, फुले चौक, सावनेर वर्ष 5) शिपा मुसरफ शेख, वय 07 वर्ष, रा. महाजन ले–आउट, फुले चौक, सावनेर व 6) आशिष ज्ञानेश्वर ठाकरे वय 26 वर्ष, रा. झिंगाबाई टाकळी, नागपूर असे आहेत.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 119/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी जखमी असल्याने अटक नाही. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री सुर्यप्रकाश मिश्रा हे करीत आहे.

4) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावरील राष्ट्रीय महामार्ग क्र. 44 जबलपुर नागपुर रोड आशु ढाबा समोर खंडाळा डुमरी शिवार येथे दिनांक 03/01/2022 चे 06:00 वा. दरम्यान अज्ञात वाहन चालक आरोपीने आपले ताब्यातील वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून जबलपुर वरून नागपुर कडे पायदळ जाणारा अनोळखी इसम वय अंदाजे 40–45 वर्ष यास धडक देवून पळून गेला. या अपघातात अनोळखी इसम याचा जागीच मृत्यु झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा जयंत शेरेकर, पो.स्टे.पारशिवनी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 134(ए), 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री विनायक नागुलवार 9923372647 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर